नगराध्यक्ष, नगरसेवकांची मुख्याधिकाऱ्यांसोबत बाचाबाची

● मुख्याधिकाऱ्यांनी घेतली पोलीस स्टेशनमध्ये धाव● देयकांवरून उद्भवला वाद

चांदूर रेल्वे दि.६: कंत्राटदारांच्या देयकांवरून वाद उद्भवुन नगराध्यक्ष, नगरसेवकांची मुख्याधिकाऱ्यांसोबत बाचाबाची झाल्याची घटना शनिवारी स्थानिक नगर परीषदमध्ये घडली. यामध्ये मुख्याधिकाऱ्यांची थेट पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली व यानंतर नगराध्यक्ष, नगरसेवकांनी न. प. गेटसमोरच ठिय्या आंदोलन केले. तिवसा नगरपंचायतचा असाच प्रकार ताजा असतांना दोनच दिवसांत जिल्ह्यातील ही दुसरी घटना ठरली आहे.

सविस्तर माहितीनुसार, चांदूर रेल्वे नगर परिषद अंतर्गत विविध कामांचे कंत्राट दिल्या गेले आहे. अशातच दिवाळी आली असतांना थकीत देयके कंत्राटदारांना देण्याकरीता यावर चर्चा करण्यासाठी शनिवारी नगराध्यक्ष शिट्टु उर्फ निलेश सुर्यवंशी यांनी मुख्याधिकारी मिलींद दारोकार यांना आपल्या कॅबीनमध्ये बोलावले. यावेळी चर्चा करीत असतांना नगराध्यक्ष, नगरसेवक व मुख्याधिकारी यांच्यात बाचाबाची झाली. चर्चा दरम्यान मुख्याधिकारी दारोकार नगराध्यक्षांच्या कॅबीन बाहेर निघुन आले. बाहेर आल्यानंतर सुध्दा नगरसेवकांनी त्यांच्यासोबत चर्चा सुरूच ठेवुन देयके देण्याची मागणी केली. उद्भवता वाद पाहता मुख्याधिकाऱ्यांनी धावत - धावत बाजुला असलेले पोलीस स्टेशन

गाठले. त्यानंतर सत्ताधारी व विरोधी पक्षाचे नगरसेवक सुध्दा पोलीस स्टेशनमध्ये गेले. व ठाणेदारांसमक्ष चर्चा करण्यात आली. परंतु तरीही मुख्याधिकारी आपल्या निर्णयावर ठामच होते. यानंतर सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांच्या कारभाराविरोधात न. प. कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करून नगर परीषदचे मुख्य प्रवेशव्दार बंद केले होते. यानंतर नगरसेवकांनी जिल्हाधिकारी यांची शनिवारी सायंकाळी ४ वाजता भेट घेऊन सदर प्रकार सांगुन मुख्याधिकाऱ्यांची तक्रार केली. या वादामुळे नगर परीषदचा कारभार एकप्रकारे ठप्प पडला होता.

> जनतेच्या काही समस्या निकाली काढण्याकरीता मुख्याधिकारी यांना मी कॅबीनमध्ये बोलावले होते. यावेळी मुख्याधिकाऱ्यांनी मला उध्दटपणे वागणुक देऊन तेथुन सरळ पोलीस स्टेशन गाठले.
>
> **शिट्टु उर्फ निलेश सुर्यवंशी, नगराध्यक्ष**

> नगराध्यक्षांच्या कक्षात चर्चा सुरू असतांना मधातच मुख्याधिकारी बाहेर पडले. यावेळी मी सुध्दा बाहेर येऊन मुख्याधिकाऱ्यांना समजावले व नागरिकांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने चर्चा करून यावर तोडगा काढू असे म्हटले. परंतु मुख्याधिकारी हे आत न येता सरळ पोलीस स्टेशनमध्ये गेले. मी मुख्याधिकाऱ्यांसोबत दादागिरी केली नसुन लावलेले आरोप बिनबुडाचे आहे.
>
> **नगरसेवक प्रफुल्ल कोकाटे**

> नगराध्यक्षांनी मला कॅबीनमध्ये बोलावुन ५ लाखांचं पेमेंट ॲडजस्ट करून काढायचं आहे असं सांगितलं. त्यावर मी त्यांना लेखी पत्र मागुन नियमात बसत असेल तर पेमेंट काढेल असं सांगितलं. या दरम्यान काही वेगळा विषय काढत असल्यामुळे मी त्यांच्या कॅबीनच्या बाहेर आलो. तेव्हा गेटमधून नगरसेवक कोकाटे बाहेर आले. व त्यांनी दादागिरी सारखं करून माझा हाथ पकडण्याची कोशिश केली. यावेळी मी त्यांना थोडं लोटलं आणि पोलीस स्टेशनला चला असं म्हटलं. मी नगर परीषदमधील सर्व बिलांची कारवाई नियमानुसार केली आहे.
>
> **मिलींद दारोकार, मुख्याधिकारी**

७० गाव पाणीपुरवठा योजनेचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेत करण्यात येणार

निवेदिता दिघडे-चौधरी यांना मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

अमरावती दि.६: ७० गाव पाणीपुरवठा योजना म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या मोर्शी व तिवसा विधानसभा मतदार संघातील ७० गावांना महाराष्ट्र जिवन प्राधीकरणाकडुन पाणी पुरवठा २०१३ पासुन बंद असल्याने मोर्शी व तिवसा विधानसभा मतदार संघातील ३५ व मोर्शी तालुक्यातील ३५ गांवानमध्ये पाण्याची समस्या निर्माण झाली आहे .नागरीकांना पिण्याच्या पाण्याची समस्या असह्य झाल्याने ७० गाव पाणीपुरवठा योजनेचा समावेश मुख्यमंत्री पेयजल टप्पा -१ मध्ये करण्याची मागणी भाजपाच्या तिवसा विधान सभेच्या नेत्या निवेदिता दिघडे चौधरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गुरुकुंज मोझरी येथिल राष्ट्रसंत तुकडोजी महराजांच्या पुण्यतिथी महोत्सवात केली.

मोर्शी व तिवसा विधानसभा मतदार संघातील ७० गावांना २००८ पासुन महाराष्ट्र जिवन प्राधीकरण कडुन पाणीपुरवठा करण्यात येत होता परंतु देखभाल दुरस्ती व अन्य आनुषांगिक बांबीमुळे छोटया ग्रामपंचायतीना देखभालीचा आर्थिक भार परवडत नव्हता त्यामुळे सन २०१३ पासुन तत्कालीन आघाडी शासनाने गावकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने आज अक्षरक्ष ७० गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत आहे.

ही समस्या कायमची मार्गी लागावी म्हणुन निवेदिता दिघडे - चौधरी यांनी सप्टेंबर २०१८ मध्ये पाणीपुरवठामंत्री बबनराव लोणीकर

यांच्याकडे सुध्दा सदर योजनेचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करण्याची मागणी केली होती . परंतु आता खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ७० गाव पाणीपुरवठा योजनेचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेच्या फेस १ मध्ये करण्यासाठी सकारात्मकता दर्शविली असुन मंत्रालयात याबाबत लवकरच बैठक लावण्याचे निर्देश प्रधान सचिवांना दिले आहे.त्यामुळे ७० तहानलेल्या गावांचा सुधारीत योजनेत समावेश होवुन लवकरात लवकर पाणी टंचाईची समस्या सुटणार आहे.

गोरगरिबांच्या दिवाळीसाठी लिगल स्केअरचा पुढाकार

कपडे, शैक्षणिक साहित्य आणि फराळाचे करणार वाटप

अमरावती, दि.६: शहरातील काही नवयुवकांनी एकत्रित येत तयार केलेल्या लिगल स्केअर क्लबमार्फत गोरगरिब तसेच भटक्या कुटूंबातील बालकांची दिवाळी साजरी करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. लोकसहभागातून हा सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प क्लबच्या सदस्यांनी केला असून त्यांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.

अमरावती शहरात अनेक भागातील अतिशय हलाखीच्या परिस्थितीत राहणारे बालक असून त्यांना सर्वसामान्यांप्रमाणे दिव्यांचा सण आनंदाने साजरा करता यावा यासाठी क्लबच्या सचिव प्रियंता राजनेकर यांनी ही संकल्पना पुढे आणली आहे. त्याला क्लबमधील सदस्यांनी होकार देत हा सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. यामध्ये लिगल स्केअर क्लबमार्फत गरिब मुलांच्या शिक्षणासाठी लागणारे सर्व प्रकारच्या साहित्य समाजातून गोळा केले जाणार आहे. तसेच त्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी यासाठी त्यांना नवीन किंवा चांगले असणारे जुने कपडे देखील गोळा केले जाणार आहेत. तसेच दिवाळीसाठी फराळाचे साहित्य देखील गोळा करून ते दिवाळीसाठी त्यांना क्लबमार्फत वाटप केले जाणार आहे. गोरगरिबांच्या दिवाळीसाठी क्लबने हाती घेतलेल्या या उपक्रमाला सर्वत्र चांगला प्रतिसाद देखील मिळत असून याबद्दल क्लबच्या सदस्यांचे समाजातून कौतुक देखील केल्या जात आहे.

विधी महाविद्यालयात साहित्य देण्याचे आवाहन या उपक्रमात आपला सहभाग देण्यासाठी इच्छूक असलेल्यांनी आपले साहित्य तसेच भेटवस्तू डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात सकाळी ९ ते ५ या वेळात जमा करावी असे आवाहन करण्यात आले आहे. लिगल स्केअर क्लबचे अध्यक्ष तसेच युवक बिरादरी अमरावतीचे सचिव सुरज जामठे यांनी तसे आवाहन शहरवासीयांना केले आहे. या उपक्रमासाठी अनिमेश भडांगे, अंकुश नाचणे, ॲड.दत्ताराम मुळगडे, निलेश मुळगळे, अपेक्षा लांडगे, रेणुका लोडम, गौरव जामठे, महेश बैगणे, सुमित गवळी, किर्ती सरोदे आदी सदस्य प्रयत्नरत आहेत.

राजुरा केंद्रातील जिल्हा परिषद शाळांमध्ये बालगोपाळांचा 'दीपोत्सव'

चांदूर रेल्वे दि.६: प्रथम सत्रातील शाळेचा अंतिम दिवस आणि दीपावली सणातील पहिला दिवस...दफ्तरमुक्त शाळेचे वातावरण...शाळेच्या परिसरात रांगोळ्यांची सजावट ...काही ठिकाणी सडा सारवण व आंब्यांच्या पानाची तोरणे ...मुलांची आकाशदिवे करण्याची धडपड....मुलींची दिवे,पणत्या लावण्याची लगबग....आणि आपल्या मुलांचा हा दीपोत्सव बघण्यासाठी पालकांची हजेरी.अश्या आनंददायी वातावरणात राजुरा केंद्रातील सर्वच शाळांमध्ये शिक्षकांच्या पुढाकारातून बालगोपालांनी दीपोत्सव साजरा केला.

प्रथम मूल्यमापन चाचणी चे त्राण डोक्यातून मोकळे झाल्यामुळे मुलांना आपल्या स्वतःच्या शाळेतच दीपावली उत्सव साजरा करण्याची संकल्पना केंद्रप्रमुख सुभाष भगवे आणि विषयतज्ज्ञ श्रीनाथ वानखडे यांनी सोशल माध्यमाद्वारे शिक्षकांसमोर मांडली. प्रथम सत्रातील शेवटचा दिवस आणि दीपावली सणाचा पहिला दिवस तसेच शनिवारची दफ्तरमुक्त शाळा असल्याने शिक्षकांनी मुलांच्या आवडीनुसार कामाची विभागणी केली .सकाळी काही शाळांमध्ये परिसरात पाणी शिंपडून,परिसर स्वच्छ करून रांगोळ्यांची सजावट करण्यात आली.काही शाळांमध्ये तर झेंडू ची फुले व आंब्यांच्या पानाची तोरणे पण होती.प्रथम सत्र परीक्षामध्ये कला,कार्यानुभव हा विषय असल्यामुळे बहुतांश शाळांमध्ये आकाशदिवे तयार करण्यात आली.याच आकाशदिव्यांची प्रदर्शनी तोरणाच्या स्वरुपात लावण्यात

आली.काही शाळांमध्ये मुलांनी स्वयं फुर्तीने शिक्षकांसाठी ग्रीटिंग कार्ड तयार केली.विद्यार्थ्यांनी दिवे व पणत्यांची आरास सजवून दीपावली सणाचे वातावरण शाळाशाळांमध्ये निर्माण झाले होते.काही शाळांमध्ये पोषण आहारामध्ये मिष्ठान्न देण्यात आले.त्यातच पालक सभा आयोजित करावयाची असल्याने आज पालकांनी सुद्धा शाळांमध्ये हजेरी लावली.पर्यवेक्षकीय यंत्रणेने सुद्धा आज बहुसंख्य शाळेला भेट देवून शाळा व्यवस्थापन समिती व पालकांशी संवाद साधला.आणि दीपोत्सव निमित्य सर्व बालगोपाल शिक्षकांना शुभेच्छा देत या उपक्रमाचे कौतुक केले. दिवाळी सणाला ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आपले श्रध्दास्थान, प्रतिष्ठान,व्यापार साहित्याची पूजा अर्चना करतात अगदी त्याच मनोभावे शाळा ही ज्ञानदानाचे पवित्र ठिकाण असल्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्रितपणे या दिवाळी सणाचा आनंद घ्यावा म्हणून हा दीपोत्सव शिक्षकांचा पुढाकारातून साजरा केल्याचे या केंद्राचे केंद्रप्रमुख सुभाष भगवे व श्रीनाथ वानखडे यांनी सांगितले. केंद्रातील राजुरा, धोत्रा, मोगरा, निम्भा, बोरी, किरजवळा, टेंगलबाद,वाई बोथ,धानोरा मोगल,एकपाळा,जवळा आदी सर्वच शाळांमध्ये हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

जलयुक्त पावले भुजल वाढले!

मोताळ्यात ११ नोव्हेंबरला धम्मचक्र प्रवर्तनदिन साजरा होणार : भीमराव तायडे